# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

## निदेश क्र. १४/२०२०

**विद्यापीठ परीक्षेत्रात कोविड–१९ चा प्रादुर्भाव व टाळेबंदीमूळे उद्भवलेल्या परिस्थितीत प्रवेशित विद्यार्थ्यांकरिता घेण्यात येणाऱ्या उन्हाळी परीक्षा २०२० करीता पध्दती आणि रचना इत्यादीविषयी प्रक्रिया निर्धारित करणारा निदेश, २०२०.**

**ज्याअर्थी**, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ हा दिनांक १ मार्च, २०१७ पासून लागू झालेला आहे.(महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६/२०१७);

**आणि**

**ज्याअर्थी**, वर नमुद असलेला अधिनियम गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली साठी लागू करण्यात आला आहे;

**आणि**

**ज्याअर्थी**, कोविड १९ च्या प्रादुर्भावामुळे व त्याअनुषंगाने उत्पन्न झालेल्या परीस्थितीमुळे विद्यापीठाच्या उन्हाळी २०२० परीक्षांचे संचालन व नियोजन संदर्भात महाराष्ट्र शासनाच्या वतीने गठीत समितीच्या शिफारशी उच्च शिक्षण संचालक, पुणे यांच्या कडून शासन पत्र क्र. संकिर्ण युएनआय/४१३१, दि. ०८ मे २०२० नुसार विद्यापीठाला प्राप्त झाल्या होत्या;

**आणि**

**ज्याअर्थी**, विद्यापीठाच्या उन्हाळी २०२० परीक्षांचे संचालन व नियोजन संदर्भात महाराष्ट्र शासनाच्या वतीने गठीत समितीच्या शिफारशी उच्च शिक्षण संचालक, पुणे यांच्या कडून शासन पत्र क्र. संकिर्ण युएनआय/४१३१, दि. ०८ मे २०२० नुसार गोंडवाना विद्यापीठ स्तरावर १० सदस्यीय समिती गठित करून उन्हाळी परीक्षा बाबत मार्गदर्शक सुचना दि. १९/०५/२०२० रोजी प्रकाशित करण्यात आलेल्या होत्या;

**आणि**

**ज्याअर्थी**, सदर बाब परिनियमाद्वारे नियमित होणे आवश्यक होते;

**आणि**

**ज्याअर्थी**, परिनियम तयार करून मान्यता घेतल्या जाण्याची प्रक्रिया वेळ खाऊ स्वरूपाची होती;

**आणि**

**ज्याअर्थी,** उपरोक्त शासन पत्र व गोंडवाना विद्यापीठ गठित समिती द्वारे सुचित मार्गदर्शक सुचनांच्या आधारावर निदेश तयार करण्याची नितांत आवश्यकता होती;

**त्याअर्थी,** मी. डॉ. ना. व्यं. कल्याणकर, कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ, अधिनियम, २०१६ च्या कलम १२(८) अंतर्गत मला प्राप्त असलेल्या अधिकारान्वये **निदेश क्र. १४/२०२०** म्हणून खाली नमुद असलेले निदेश निर्गमित करीत आहे.

१. या निदेशाला '' **विद्यापीठ परीक्षेत्रात कोविड–१९ चा प्रादुर्भाव व टाळेबंदीमूळे उद्‌भवलेल्या परिस्थितीत प्रवेशित विद्यार्थ्यांकरिता घेण्यात येणाऱ्या उन्हाळी परीक्षा २०२० करीता पध्दती आणि रचना इत्यादीविषयी प्रक्रिया निर्धारित करणारा निदेश, २०२०**'' असे संबोधण्यात येईल.

२. हा निदेश ज्या तारखेला निर्गमित करण्यात येईल त्या तारखेपासून अमंलात येईल.

३. विद्यापीठातील सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षे विषयी वेळोवेळी निर्गमित केलेले निदेश, अध्यादेश, परिनियम, परिपत्रक व आदेश इत्यादीमधील तरतुदी उन्हाळी परीक्षा २०२० वगळून आजही लागू असतील.

४. कोविड १९ च्या प्रादुर्भावामुळे व त्याअनुषंगाने उत्पन्न झालेल्या परीस्थितीमुळे विद्यापीठाच्या उन्हाळी २०२० परीक्षांचे संचालन व नियोजन संदर्भात महाराष्ट्र शासनाच्या वतीने गठीत समितीच्या शिफारशी उच्च शिक्षण संचालक, पुणे यांच्या कडून शासन पत्र क्र. संकिर्ण युएनआय/४१३१, दि. ०८ मे २०२० द्वारे निर्गमित केलेल्या असून त्यामधिल तरतूदी गोंडवाना विद्यापीठाला लागू असतील.

५. **परीशिष्ट 'अ'** मध्ये नमुद सत्रातील नियमीत विद्यार्थ्यांची उन्हाळी – २०२० ची परीक्षा घेण्यात येणार नाही. अशा सर्व विद्यार्थ्यांना मिळणारी श्रेणी ही ५०टक्के गुण अंर्तगत मुल्यमापनावर आधारीत असेल आणि ५० टक्के गुण मागच्या सत्रातील परीक्षेचे सरासरी गुण लक्षात घेऊन ठरविले जाईल व तशी गुणपत्रिका सर्व विद्यार्थ्यांना विद्यापीठाद्वारे वितरीत केल्या जाईल.

६. सदर विद्यार्थ्यांना मिळणारी श्रेणी परिच्छेद क्र. ५ प्रमाणे संबंधीत परीक्षा योजनेच्या प्रमाणात खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे ठरविल्या जाईल.




७. अंर्तगत मुल्यमापनाचे गुण हे विषयाचे निरंतर मुल्यमापना अंतर्गत विहीत विविध मुल्यांकन पध्दती, सत्रपूर्व परीक्षा व सत्रामध्ये परीक्षा या आधारावर द्यावयाचे आहेत, त्यामुळे महाविद्यालयाने घेतलेल्या परीक्षेच्या उत्तरपत्रिका व निरंतर मुल्यमापनाच्या राबविलेल्या प्रक्रियेचे दस्तावेज सिलबंद लिफाफ्यामध्ये बंद करून महाविद्यालयामध्येच सुरक्षीत जतन करून ठेवावे व विद्यापीठाने मागणी केल्यानंतर सदर दस्तावेज सादर करणे बंधनकारक राहील.

८. परिच्छेद क्र. ५ व ६ नुसार विद्यापीठाद्वारे दिलेले गुण एखाद्या विद्यार्थ्यास मान्य नसल्यास अशा विद्यार्थ्याला प्राप्त श्रेणी (ग्रेड) मध्ये सुधारणा करावयाची असल्यास हिवाळी २०२० परीक्षेमध्ये परीक्षा आवेदन पत्र देवून परीक्षा देता येईल व त्या परीक्षेत मिळविलेले गुण अंतिम समजण्यात येईल.

९. परीशिष्ट 'अ' मध्ये दर्शविलेल्या विद्यार्थ्याचे मागील सर्व परीक्षेतील अनुशेष असल्यास अशा सर्व विद्यार्थ्यांच्या सर्व सत्राच्या परीक्षा विद्यापीठाद्वारेच घेतल्या जातील. सदर परीक्षा सत्र २०२०—२१ सुरू झाल्यानंतर १२० दिवसाच्या कालावधीत घेण्यात येईल. मात्र परीक्षेचे स्वरूप व पध्दती विद्यापीठाद्वारे नंतर कळविण्यात येईल.

१०. जे विद्यार्थी पुढील सत्राच्या प्रवेशापासून खंडीत (D.C.) झाले असतील व शैक्षणिक सत्र २०१९— २० मधे नियमीत प्रवेशीत नाहीत, असे सर्व विद्यार्थी 'कॅरी फारवर्ड' च्या पध्दतीनुसार शैक्षणिक सत्र २०२०—२१ मध्ये प्रवेशासाठी पात्र असतील. परंतू ही सुविधा फक्त विद्यमान

शैक्षणिक वर्षापुरतीच असेल आणि असा प्रत्येक विद्यार्थी गैरहजर किवा अनुतीर्ण विषयाच्या परीक्षेचे विद्यापीठाद्वारे जेव्हा नियोजन होईल तेव्हा ती परीक्षा उत्तिर्ण करेल व अशा सर्व परीक्षा शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यानंतर १२० दिवसाच्या आत घेण्यात येतील.

११.ज्या विद्यार्थ्यांची उपस्थिती टाळेबंदी सुरू होण्यापूर्वी ७५ टक्या पेक्षा कमी असेल अशा सर्व विद्यार्थ्यांकरीता टाळेबंदीचा कालावधी हा त्या विद्यार्थ्यांचा उपस्थिती कालावधी म्हणुन ग्राहय धरण्यात येईल.

१२.उपरोक्त उल्लेखीत आयोजीत करण्यात येणा—या परीक्षा या विद्यापीठाच्या १००% अथवा संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारीत असतील.

१३.पदविका, पदवीपूर्व व पदव्युत्तर परीक्षेच्या अंतीम वर्षाच्या प्रात्यक्षिक परीक्षा परीक्षार्थींचे छोट्या तुकड्यामध्ये विभाजणी करून दिवसभरात किमान कालावधीच्या अनेक तुकड्याद्वारे वेळापत्रक करून घ्यावयाच्या आहेत. अंतर्गत व बर्हिगत परीक्षक संबंधीत महाविद्यालयाने शक्यतो आपल्याच महाविद्यालयातील प्राध्यापकांना नेमावयाचे आहे. मात्र संबंधीत महाविद्यालयात बहिर्गत पर्यवेक्षक उपलब्ध नसल्यास लगतच्या महाविद्यालयातील अथवा लगतच्या परीसरातील प्राध्यापकांची बहिर्गत परीक्षक म्हणुन महाविद्यालयाने आपल्या स्तरावरून नेमणुक करावी व दिलेले गुण ऑनलाईन पध्दतीने परीक्षा संपल्यानंतर लगेच विद्यापीठाकडे पाठवायचे आहे. जर विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष बोलावून मुल्यमापन करणे शक्य नसेल तर त्यांचे जर्नल्स, अंतर्गत परीक्षा व मौखीक परीक्षा ऑनलाईन घेउन या आधारावर त्याचे मुल्यमापन करावयाचे आहे. प्रत्येक महाविद्यालयाने प्रात्यक्षिक परीक्षेचे वेळापत्रक स्वत:च्या सोईनुसार व शासनाच्या कोविड — १९ संदर्भातील मार्गदर्शक सुचनेनुसार तयार करावयाचे आहे.

१४.परीशिष्ट 'अ' मधील नमुद विद्यार्थ्यांना विद्यापीठाद्वारे निकाल घोषित करून गुणपत्रिका दिल्या जातील.

१५.पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या सर्व बहिश:ल विद्यार्थ्यांच्या परीक्षा यथायोग्य वेळेनुसार विद्यापीठाद्वारे घेतल्या जाईल. तसेच अश्या सर्व विद्यार्थ्यांच्या सर्व सत्राच्या परीक्षा विद्यापीठाच्या प्रचलीत नियमानूसार घेण्यात येईल.

१६.जे विद्यार्थी टाळेबंदी मुळे विहित मुदतीत परीक्षा आवेदनपत्र सादर करू शकले नाही अशा सर्व विद्यार्थ्यांना आवेदन पत्र सादर करण्यास यथायोग्य मुदतवाढ देण्यात येईल व तशा सुचना विद्यापीठाच्या www.unigug.ac.in या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रकाशित करण्यात येईल.

१७.कोविड १९ च्या प्रादुर्भावामुळे व त्याअनुषंगाने उत्पन्न झालेल्या परीस्थितीमुळे विद्यापीठाच्या उन्हाळी २०२० परीक्षा पध्दती आणि रचना इत्यादीविषयी सदर निदेशाअंतर्गत उल्लेखीत प्रावधान वगळता अन्य बाबतीत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार मा. कुलगुरू महोदयांना असेल व तो सर्व संबंधीतांना बंधनकारक राहील.

## परीशिष्ट – 'अ'

| अनु. क्र. | अभ्यासक्रमाचे एकुण वर्ष | सत्र |
|---|---|---|
| १ | दोन वर्षीय अभ्यासक्रम | २ |
| २ | तिन वर्षीय अभ्यासक्रम | २ व ४ |
| ३ | चार वर्षीय अभ्यासक्रम | २, ४ व ६ |
| ४ | पाच वर्षीय अभ्यासक्रम | २, ४, ६ व ८ |

स्थळ: गडचिरोली
दिनांक: २५/०६/२०२०

25/06/2020

(डॉ.एन.व्ही.कल्याणकर)
कुलगुरू